**क्रमांक १५**

**महाराष्ट्र विधानपरिषद**

**पत्रक भाग दोन**

**सोमवार, दिनांक ३ मार्च, २०२५/ फाल्गुन १३, १९४६ (शके)**

**१६. मा.राज्यपालांच्या अभिभाषणावरील आभार प्रदर्शनाच्या प्रस्तावास सुधारणा मांडण्याबाबत.**

महाराष्ट्र विधानपरिषदेच्या सर्व सदस्यांना निदेशानुसार कळविण्यात येते की, विधानमंडळाच्या उभय सभागृहांच्या सदस्यांपुढे आज, सोमवार, दिनांक ३ मार्च, २०२५ रोजी झालेल्या मा.राज्यपालांच्या अभिभाषणावर आभार प्रदर्शनाच्या प्रस्तावावर मंगळवार, दिनांक ४ मार्च व बुधवार, दिनांक ५ मार्च, २०२५ रोजी चर्चा होणार आहे. आभार प्रदर्शनाच्या प्रस्तावास सदस्यांना सुधारणा मांडावयाच्या असल्यास आज सोमवार, दिनांक ३ मार्च, २०२५ रोजी सायंकाळी ६.१५ वाजेपर्यंत **e2.council.mls@gmail.com** या ई-मेल वर (**DVOT-SUREKH** या **Font**) मध्ये देण्यात याव्यात तसेच विहित वेळेत प्राप्त न झालेल्या किंवा ऑफलाईन पद्धतीने प्राप्त होणाऱ्या सूचना कार्यवाहीतून वगळण्यात येतील.

निदेशानुसार असेही कळविण्यात येते की, म.वि.प. नियम ५९ मधील परंतुकानुसार कोणत्याही सदस्याला अशा सुधारणांच्या दहा पेक्षा जास्त सूचना देता येणार नाहीत.

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : ३ मार्च, २०२५.

**जितेंद्र भोळे**
सचिव (१), (का.)
महाराष्ट्र विधानपरिषद.

**प्रती :**

**१.** महाराष्ट्र विधानपरिषदेचे सर्व सदस्य.
**२.** मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे सचिव.
**३.** मा.उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी.
**४.** मा.विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी.
**५.** सचिव (१) (का.), महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे स्वीय सहाय्यक.

**६.** सचिव (२) (का.), महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे स्वीय सहाय्यक.

**७.** महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व अधिकारी व सर्व कक्ष.

**८.** प्रधान सचिव, संसदीय कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई.

**९.** महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व पक्ष कार्यालये

**१०.**संगणक कक्ष, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

----------